|| श्री गणेशाय नमः ||

Astro • Puja • Vastu

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

## ज्योतिष आणि वास्तु सल्लागार


योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 95944 28749

निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 86524 02078

# श्री
# पांढरे बुधवार व्रतकथा



ताडदेव बुक डेपो प्रकाशन, मुंबई ७.

For Hariom Astrologers

# शीघ्र फलदायीं पांढरे बुधवार व्रत

कोणत्याही गोष्टीच्या यशस्वितेसाठी बुद्धीची आवश्यकता असते. युक्ति–शक्तीनें अनेक गोष्टी साध्य होत असल्या तरी त्याला बुद्धीची जोड अवश्य लागते. एकाद्याजवळ संपत्ती असेल पण त्याला जर बुद्धी नसेल तर ती संपत्ती जायला काही फार वेळ लागणार नाहीं. पण बुद्धीची देणगी लाभलेल्याला श्रीमंत व्हायला फारसा वेळ लागणार नाहीं. बुद्धीनें युक्ती सुचते व त्यामुळें अंगी बळ येते. त्यामुळें कोणतेही काम तडीस नेता येते. ही बुद्धी अंगी येण्यासाठी व असलेल्या बुद्धीची वाढ होण्यासाठीं बुद्धीचा ग्रह जो बुध त्याची उपासना करणें अवश्य आहे. बुधाचा अंमल वाणीवर चालतो. त्यामुळें द्वितीय स्थानात जर बुध बिघडला असेल तर मनुष्याच्या वाणीत दोष उत्पन्न होतो अशा माणसानेही बुधाची उपासना केल्यावर त्याचा दोष नाहीसा होतो. बुध हा बुद्धिदाता, भाग्यविधाता, भाग्य देणारा ग्रह असल्यामुळें त्याची उपासना शीघ्र फलदायी असते.

भाग्यकारक अशा सर्व गोष्टी बुधाच्या कृपेने प्राप्त होतात म्हणून त्याची कृपा प्राप्त होऊन तो प्रसन्न होण्यासाठी त्याची उपासना करणे अत्यंत जरूरीचे आहे.

पांढरे बुधवारांचे व्रत केल्याने, नोकरी नसणारांना नोकरी लागते. नोकरी असणारांना

नोकरीत प्रमोशन मिळते. नको असलेली बदली फिरते. हवी असलेली बदली मिळते. वरिष्ठ खूष होऊन नोकरी सुखदायक होते. नोकरीत कसल्या अडचणी, कटकटी निर्माण होत नाहीत बुध हा व्यापारधंद्याला उपकारक ग्रह असल्यामुळें याच्या व्रताने व्यापार–धंदा चांगला चालतो. व्यापारात, दलालीत एजन्सीत वगैरे खूप फायदा व प्रगती होते. व्यापार-धंदा चांगला चालून त्यांत भरपूर धन–संपत्ती मिळते. बुधाच्या उपासनेने मानसिक रोगही बरे होतात. आरोग्यवृद्धी होते. विद्यार्थ्यांना बुद्धिचापल्य प्राप्त होते स्मृती तजेलदार बनते. परीक्षेत चांगले यश प्राप्त होते. संसारांतील कलह, भांडणे, हेवे-दावे नाहिसे होऊन मनस्वास्थ्य लाभते. या व्रताच्या योगाने आपले संपूर्ण जीवन सुख-समृद्धीकारक होते. म्हणून हें व्रत करणें अत्यंत जरूरीचें आहे.

## पांढरे बुधवार व्रत करणाराने कसे वागावे

(१) व्रत करणाराने क्रमाने ११ बुधवार करावयाचे.

(२) दिवसभर उपास करून संध्याकाळीं उपास सोडावयाचा.

(३) फराळासाठी साबुदाणा भगर वगैरे उपासाला चालणाऱ्या पांढऱ्या वस्तूचा, खिचडी-खीर-सोजी वगैरे एक पदार्थ कायम ठरवून ठेवावा व तोच अकराही बुधवारी फराळासाठी घ्यावा. त्यात दूध-दहीं-साखर-तूप हे पांढरे पदार्थ वापरावे. दूध प्यावे. [पांढऱ्या रंगाच्या वस्तू]



(४) तसेच रात्री उपवास सोडतांनाही ठरावीक दूध-भात, दहींभात, तूपभात, ताक-भात जेऊनच उपास सोडावा. फराळाचे व जेवणाचे सर्व पदार्थ पांढरे व अळणी असावेत. तसेच तो ठरवून ठेवलेला एकच पदार्थ ११ ही बुधवारी असावा. या दिवशी मीठ अजिबात वर्ज्य आहे.

(५) साधारणपणे दिवसभर पांढरेच कपडे अंगावर असावेत. पूजेच्या वेळी तर पांढरे शूभ्र नेसते वस्त्र व अंगावर पांढरे उपवस्त्र असावे. या व्रताला पांढऱ्या रंगाचे फार महत्त्व आहे.

(६) व्रताच्या दिवशी शक्यतो कमी बोलावे. भांडण-तंटा, वाद-विवाद करू नयेत.

(७) सकाळी उठल्यावर स्नानादि कामे आटोपून धुतलेलें शुभ्र वस्त्र नेसावे. पांढरी सुवासिक फुले घेऊन आपल्या कुलदेवतेची मनोभावे पूजा करावी. दूध-साखर वगैरे पांढऱ्या वस्तुंचा नैवेद्य दाखवावा. पूजा झाल्यावर पुढील मंत्राचा ११ वेळ जप करावा.

**ॐ नमो देव्यै महादेव्यै, शिवायै सततं नमः ।**
**नमः प्रकृत्यै भद्रायै, नियताः प्रणताः स्मताम् ॥**

देवाला दाखविलेला नैवेद्य नंतर आपणच घ्यावा. फराळ करून नंतर आपल्या नोकरी–धंद्यावर जावे. नेहमीच्या उद्योगाला लागावे.

(८) संध्याकाळीं कामा–धंद्यावरून आल्यावर पुन्हा स्नान करून कुलदेवतेची मनोभावें शुभ्र वस्तूंनीच गंध, फूल, तांदूळ वगैरेनी पूजा करावी. पूजा करतांना कुलदेव-देवी प्रत्यक्ष

समोर आहे असे समजून त्या देवतेशी एकरूप होऊन प्रार्थना करावी व आपली इच्छा सांगून ती पूर्ण करण्यासाठी विनवावे. प्रार्थना करावी. नमस्कार करावा.

(९) कुलदेवतेची पूजा झाल्यानंतर;

**ॐ नमो देव्यै महादेव्यै । शिवायै सततं नमः ।**
**नमः प्रकृत्यै भद्रायै । नियताः प्रणताः स्मताम् ॥**

या मंत्राचा ११ वेळ जप करावा. नंतर देवीची आरती म्हणावी, आरतीला पांढरा धूप, कापूर द्यावा.

## श्रीभगवतीची आरती

जय देवी भगवती । करी मी मंगलमय आरती ॥ धृ० ॥ ॐकाराचे आद्य स्वरुप तू ॥ महाशक्ती आद्यदेवी तू ॥ मूळमाया जगतजननी तू ॥ जय शांता भगवती । करी मी मंगलमय आरती ॥ १ ॥ चंडमुंड मातले अरी ते ॥ निर्दाळिनी कळीकाळाते ॥ सुखी करीशी सद्‌भक्तांते ॥ जय दुर्गा भगवती । करी मी मंगलमय आरती ॥ २ ॥ तव सेवेला येति योगिनी ॥ तीर्थे आली चरणा लागुनी ॥ पापें जाती सर्व भंगुनी ॥ जय काली भगवती । करी मी मंगलमय आरती ॥ ३ ॥ स्वरुप तुझे पाहता लोचनी ॥



मी तूं पण गेले निरसुनि ॥ पायीं तुझ्या मन गेले मोहुनी ॥ जय अंबा भगवती । करी मी मंगलमय आरती ॥ ४ ॥ अहंभाव तो अवघा गळला ॥ तव पायाचा अनुभव कळला ॥ सौख्याचा ठेवा सापडला ॥ जय लक्ष्मी भगवती । करी मी "तीर्थराज" आरती ॥ ५ ॥

आरती झाल्यावर पुढील स्तोत्र म्हणावे

## बुधस्तोत्र

श्रीगणेशाय नमः ॥ अस्य श्रीबुधपञ्चविंशतिनामस्तोत्रस्य प्रजापतिर्ऋषिः त्रिष्टुप छन्दः । बुधो देवता । बुधप्रीत्यर्थे जपे विनियोगः ॥

**बुधो बुद्धिमतां श्रेष्ठो बुद्धिदाता धनप्रदः ॥ प्रियङ्गु कलिकाश्यामः कञ्ज-नेत्रौ मनोहरः ॥ १ ॥ ग्रहोपमो रौहिणेयो नक्षत्रेशो दयाकरः ॥ विरुद्ध-कार्यहन्ता च सौम्यो बुद्धिविवर्धनः ॥ २ ॥ चंद्रात्मजो विष्णुरूपी ज्ञानी ज्ञो ज्ञानिनायकः ॥ ग्रहपीडाहरो दारपुत्रधान्यपशुप्रदः ॥ ३ ॥ लोकप्रियः सौम्यमूर्तिर्गुणदो गुणवत्सलः ॥ पञ्चविंशतिनामानि बुधस्यैतानि यः**

पठेत ॥ ४ ॥ स्मृत्वा बुध सदा तस्य पीडां सर्वा विनश्यति ॥ तद्दीने वा पठेद्यस्तु लभते स मनोगतम् ॥ ५ ॥

इति श्रीपद्मपुराणे बुधपञ्चविंशति नामस्तोत्र संपूर्णम् ॥.

नंतर पुढील ध्यान मंत्राचा ७ वेळ जप करावा.

प्रियङ्गुकलिकाश्यामं रूपेणाप्रतिमं बुधम् ।
सौम्यं सौम्यगुणोपेतं तं बुधं प्रणमाम्यहम् ॥

नंतर श्रीबुधाची पुढील प्रार्थना म्हणावी.

## श्रीबुध-प्रार्थना

ॐ अस्य श्रीबुध महामंत्रस्य ॥ प्रजापतिऋषिः त्रिष्टुप छंदः । बुधो देवता । मम श्रीबुधप्रसादसिद्धिद्वारा । चिंतितफलावाप्त्यर्थे जपे विनियोगः ॥

ॐ प्रजापत्यै ऋषये नमः मुर्ध्नि । त्रिष्टुप छंदसे नमः मुखे ।
बुधदेवतायै नमः हृदये । ॐ ब्रां ब्रीं ब्रौं सः ॥



ध्यानम् । पीतमाल्यांबरधरःसर्पाकार समद्युतिः । खड्गचक्रगदापाणि सिंधस्थो वरदो बुधः ।

बुधदेवतायनमः ॥ बुधदेवतायनमः ॥ बुधदेवतायनमः ॥

असें म्हणून आपले मनोगत पूर्ण करण्याची प्रार्थना करून साष्टांग नमस्कार घालावा. नंतर जेवण करावे. दूध-भात, ताक-भात अगर निश्चित ठरवून ठेवलेल्या जेवणाने उपवास सोडावयाचा. ( मीठ वापरावयाचे नाहीं. ) सर्व पदार्थ पांढरे असावे.

जसजसे बुधवार होऊ लागतात तसतसे आपल्याला निरनिराळे शुभानुभव निश्चित येऊ लागतात.

बुधग्रह पीडा परिहासाठीं पुढील मंत्राचा जप करावा.—

उत्पातरूपो जगतां चन्द्रपुत्रो महाद्युतिः ।
सूर्यप्रियकरो विद्वान पीडां हरतु मे बुधः ॥

(जप संख्या ४०००) ११ बुधवार मिळून सर्व जप पुरा करावा

## व्रताचे उद्यापन

याप्रमाणे क्रमाने ११ बुधवार करावे. बाराव्या बुधवारी व्रताचे उद्यापन करावे. त्या दिवशी शांत व समाधानी अशा एका पुत्रवती सुवासिनीला जेवणाचे आमंत्रण देऊन उपाशी राहायला सांगावे. नेहमीप्रमाणे ( अळणी नको ) जेवण करावे. जेवणात शेवयाची खीर अवश्य

असावी. सुवासिनीचें जेवण झाल्यानंतर तिची तांदुळाने, खणा-नारळाने ओटी भरावी. खण अगर कापड द्यावयाचे ते पांढरेच असावे. शूभ्र फुलांची वेणी द्यावी, दक्षिणा पांढऱ्या नाण्यातच द्यावी.

बाराव्या बुधवारी व्रत करणाराने ११ बुधवारांप्रमाणेच व्रताचें आचरण करावे, फक्त उद्यापनाचे जेवणाला मात्र पांढऱ्या रंगाचे बंधन नाहीं. हें जेवण दुपारी १२ नंतर केव्हाही करावें.

## महत्त्वाची सूचना

हे पांढऱ्या बुधवारांचे व्रत करतांना व्रतांत विघ्न करणाऱ्या कांहीं गोष्टी निर्माण होतील. कदाचित् स्वतःला अगर घरातल्या माणसाना आजारीपणा निर्माण होईल. मनाविरुद्ध कांहीं गोष्टीही घडतील. व्रत सोडावे असे हजार वेळां मनांत येईल, पण व्रत सोडू नका, निर्धाराने पार पाडा. व्रताने, अडचणींच्या रूपाने घेतलेल्या परीक्षेत पास व्हा. अडचणी येतील तशा त्या नाहीशाही होतील याची पक्की खात्री बाळगा. श्रीबुधदेव तुमचे नक्की चांगलेंच करील हें निश्चित. व्रत पूर्ण झाल्यावर तुमच्या इच्छापूर्तीचा आनंद तुम्हाला हमखास लाभेल.

कर्ता : **महादेवशास्त्री मराठे, शंकरेश्वर.** सर्वाधिकार प्रकाशकाचे स्वाधीन

प्रकाशक : **सुरेश शंकर तानवडे,** ताडदेव पुस्तक प्रकाशन, ताडदेव, पोस्ट ग्रँटरोड, मुंबई नंबर ७

मुद्रक : पॅरामाउंट लिथो अँण्ड ऑफसेट वर्क्स, मुंबई. ११.

❀ मिलिंदमाधवकृत ❀

अनुभवसिद्ध, शीघ्र फलदायी व्रत

# श्री लक्ष्मी माहात्म्य
# व्रत कथा व पूजाविधी

पुस्तके मराठी, गुजराती, हिंदी तिन्ही भाषेत मिळतात

पत्ता : ताडदेव बुक डेपो, महावीर अपार्टमेंट, मुंबई – ७

किंमत ८ रुपये

Astro • Puja • Vastu

# FALIT JYOTISH AND VASTU SHASTRA CONSULTANT

## FOR ALL DHARMIK POOJA'S

SHRI GANESH PUJA

SHRI SATYANARAYAN PUJA

VASTU SHANTI

WEDDING | SAKHARPUDA | MUNJ

JANANA SHANTI | RUDRABHISHEK

SAPTASHATI PATH | HAVAN | ETC.

## HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

**SANPADA OFFICE**
Office No. 8, 1st Floor, Shiva Triveni
Galleria CHS., Plot No. 13, Sector 8,
Sanpada, Navi Mumbai - 400705.

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir,
Deonar Mahanagarpalika Vasahat,
Govandi, Mumbai - 400043.

hariom astrologers
hariom astrologers
hariom_astrologers
hariomastrologers@gmail.com
www.hariomastrologers.com